


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे अंक : २६५ वा मंगळवार दि. २४ डिसेंबर २०२४ पृष्ठ ८ किंमत ३रुपये

# जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचार प्रकरणी अवर अपर सचिवांकडेही तक्रार

## दैनिक जनसंचलनव सिटी न्यूजच्या पुढाकाराने भ्रष्टाचाऱ्यांना बसणार दणका

**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्रभर गाजत असलेल्या येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात बोकाळलेल्या भ्रष्टाचारासंदर्भात आता राज्याच्या मुख्य अपर सचिवांकडे तक्रार करण्यात आली आहे. या तक्रारीच्या माध्यमातून भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई व्हावी, ही अपेक्षा आहे. सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांनी यासंदर्भातील एक पत्र हे अपर सचिवांना पाठवले आहे. दुसरीकडे दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजचा दणका या भ्रष्टाचाऱ्यांवर सातत्याने बसतो आहे. यंत्रणेतील काही भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे कारवाईला मोठा विलंब होत असल्यामुळे आता थेट अपर सचिवांकडे यासंदर्भात तक्रार करण्यात आली आहे. संदर्भासह दिलेल्या तक्रारीत चंद्रकांत खरात यांनी म्हटले आहे की, जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचार प्रकरणी वेळोवेळी चौकशी समिती गठित करण्यात आल्या होत्या. या समितीच्या सदस्यांनी बुलढाण्यात येऊन चौकशी केली व बरीच कागदपत्रे देखील नेली आहेत. चौकशी समित्यांनी जिल्हा रुग्णालयातील काही भ्रष्ट अधिकाऱ्यांवर ठपकादेखील ठेवला आहे. जिल्हा रुग्णालयात गेल्या काही वर्षांमध्ये जी काही साहित्य उपकरणे खरेदी करण्यात आली आहे, त्यात मोठा गैरव्यवहार झालेला आहे. झालेल्या विशेष लेखापरीक्षणात या संदर्भातील निष्कर्ष स्पष्टपणे समोर आले आहेत. या निष्कर्षांच्या अनुषंगाने तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितिन विठ्ठल तडस

**या संपूर्ण प्रक्रियेत झालेल्या विविध चौकश्या समितीत या दोषींवर दोष सिद्ध होऊन विभागीय चौकशी समिती गठीत करण्यात आली व त्या समितीत निलंबित भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे यांनी करोडो रुपयांचा नियमबाह्य केलेला भ्रष्टयाचार दिलेल्या अहवालात सिद्ध होऊन उपसंचालक डॉ.कमलेश भंडारी यांना कारवाई करिता जानेवारी २०२४ ला भांडारपाल बोथे यांची प्रॉपर्टी सील करा व लिलाव करून येणारा सर्व पैसा शासन तिजोरीत जमा करण्याचे पत्र देऊनही उपसंचालक अकोला डॉ भंडारी यांनी आज पर्यंत कोणतीच कारवाई केलेली नसल्याचं दिसून येत आहे.**

### पोस्टमार्टम १२६

यांच्यावर ठपका ठेवण्यात आला आहे. अहवालात म्हटले आहे की, डॉ. नितीन तडस यांनी आपल्या पदाच्या कार्यकाळात कार्यालयीन रोखवहीमध्ये दैनंदिन जमा खर्चाच्या नोंदी महिन्याअखेर घेऊन त्याचा गोषवारा नोंदवून तसेच त्यावर आहरण व संवितरण अधिकारी म्हणून स्वाक्षरी केलेली आहे किंवा नाही याची पडताळणी करणे गरजेचे होते. याशिवाय बँक पासबुकात व रोख नोंदवहीचा ताळमेळ पडताळून पाहणे गरजेचे होते. परंतु त्यांनी याची कोणतीही पडताळणी केली नाही.मॉड्युलर ओटी व लेबर रूमच्या निविदेतही डॉ. तडस यांच्या कार्यकाळात मोठा घोळ झालेला आहे. १२ कोटी ११ लाख ३० हजार चे कार्यादेश निर्गमित करताना कंत्राटदाराकडून ३ टक्के सुरक्षा ठेव म्हइणून घेणे आवश्यक असताना त्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही. हे काम विहित वेळेत आजही पूर्ण झालेले नाही. त्यावर कुठलेही नियंत्रण नव्हते. तसेच सदर कामाचे पुरवठापूर्व तपासणी पीडीआय व त्रयस्थ यंत्रणेमार्फत परीक्षण केले नाही. तसेच हे काम पूर्ण न करताही कंत्राटदाराला ८० टक्के रक्कम अदा करण्यात आलेली आहे. हा सरळ-सरळ नियमभंग आहे. डॉ. तडस यांनी महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ च्या कलम ३ चे उल्लंघन केले आहे. डॉ.तडस यांच्या कार्यकाळात सार्वजनिक आरोग्य विभागात करोडो रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याने त्यांच्यावर कारवाईचा प्रस्ताव शासनाकडे सादर झालेला आहे. परंतु या संदर्भात आजवर योग्य ती कारवाई झालेली नाही.याशिवाय भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे आणि आर. एस. लाकडे तसेच कुलकर्णी या जिल्हा सामान्य रुग्णालयातील कर्मचाऱ्यांवर मॉडेल ऑपरेशन थिएटर साहित्य खरेदी प्रक्रियेत तसेच जिल्हा वार्षिक योजनेत विविध साहित्य खरेदीत मोठा भ्रष्टाचार केलेला आहे. हा संपूर्ण भ्रष्टाचार आजवर कागदोपत्री आणि पुराव्यांनिशी सिद्ध झालेला आहे. या सर्वांनी आपसात तसेच कंत्राटदाराशी संगनमत करून शासनाचे मोठ्या




प्रमाणात नुकसान केलेले आहे. शिवाय या भ्रष्टाचारातून या सर्व भ्रष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बेनामी चल अचल संपत्ती जमा केली आहे. त्यामुळे या संपूर्ण भ्रष्टाचारात दोषी असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करून त्यांच्या करोडो रुपयांची अवैध संपत्ती जप्त करण्यात याव्यात, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज तर सातत्याने आपल्या वृत्तमालिकेतून हा भ्रष्टाचार उघड करण्याचे काम करीत आहे आणि यापुढेही करीत राहणार आहे. आता नव्याने सत्तेत आलेल्या शासनाने या भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करावी, अशी चर्चा मोठ्या प्रमाणात जनसामान्यांमध्ये होत आहे. जनभानेचा आदर ठेवून शासनाने तात्काळ भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करून त्यांना गजाआड करावे, यासाठी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज आगामी काळात संघर्ष करीतच राहणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...

# बिडी फुंकल्याने लागली आग मनोरुग्णाचा आगीत होरपोळून मृत्यू !

**जनसंचलन/बुलढाणा**

लोणार ग्रामीण रुग्णालयात मनोरुग्णाचा आगीत होरपोळून मृत्यू झाल्याची बातमी समोर आली आहे.बिडी फुंकूल्याने रुग्णालयातील बेडलाच आग लागल्याचे कारण सांगण्यात येत आहे. शहरातील बसस्थानकात २२ डिसेंबर २०२४ रोजी अनोळखी व्यक्ती झोपलेल्या स्थिती मध्ये दिसून आला असता लोणार बसस्थानक वाहतूक नियंत्रक संजय राठोड यांनी १०८ वर फोन करून सदर व्यक्तीला ग्रामीण रुग्णालयात पाठवले. लोणार ग्रामीण रूग्णालयात सदर व्यक्तीला भरती करण्यात आले. त्यांची प्राथमिक तपासणी करून उपचार करण्यात आले. त्यांनतर सदर व्यक्तीला बुलढाणा येथे पुढील उपचारासाठी पाठवण्याचे डॉक्टरानी सांगितले. मात्र सदर व्यक्तीसोबत घरचे नातेवाईक नसल्याने त्यांना एकटे पाठवणे जमत नसल्याने डॉ. फिरोज शहा यांनी या बाबतची माहिती लोणार पोलिसांना दिली. सदर व्यक्तीला लोणार ग्रामीण रुग्णालयात ठेवण्यात आले. सदर व्यक्ती हे बिडी ओढत असल्याचे लक्षात आल्याने रुग्णालयातील कर्मचारी यांनी त्यांना बिडी ओढू नकोस सांगितले होते अशी माहिती डॉ. फिरोज शहा यांनी सांगितली. रात्रीच्या वेळेस कर्तव्यावर असलेल्या सुरक्षा रक्षक उद्धव वाटसर यांना २३ डिसेंबर २०२४ च्या पहाटे ३ वाजून २० मिनिटे वाजे दरम्यान रुग्णाच्या वार्डातून धूर निघत असल्याचे दिसून आले. सदर कर्तव्यावर असलेल्या वाटसर यांनी तात्काळ रुग्णालयातील संबधितांना याबाबत कळविले व ब्रदर विष्णू खरात यांनी वार्डातील आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले व आग आटोक्यात आणली. दरम्यान रुग्णालयात दाखल असलेल्या व्यक्तीच्या बेडला आग लागून सदर व्यक्ती जळत असल्याचे त्यांना



दिसून आले. आग विझवण्यापर्यंत सदर व्यक्ती जळून मृत्यू पावले होते. सदर आगीचे कारण स्पष्ट झालेले नाही. या घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक निमिष मेहत्रे, तहसिलदार भूषण पाटील हे घटनास्थळी दाखल झाले. पाहणी करून पंचनामा झाल्यानंतर शवविच्छेदन करण्यात आले.

# अस्वलाच्या हल्ल्यात युवक जखमी

जनसंचलन/बुलढाणा

शेतातून घरी परतणाऱ्या एका ३६ वर्षीय युवकावर अस्वलाने हल्ला केला. त्यामध्ये तो गंभीर रित्या जखमी झाला. ही घटना २२ डिसेंबर रोजी सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास पळसखेड सपकाळ शिवारात घडली. जखमी युवकाला उपचारासाठी बुलढाणा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. चिखली तालुक्यातील पळसखेड सपकाळ येथील रहिवासी दीपक काशिनाथ काळे हा युवक गतिमंद आहे. शेत शिवारात तो नेहमीच फिरत असतो. रविवारी तो शेतात गेला होता. सायंकाळी घरी परतत असताना अचानक एका अस्वलाने त्याच्यावर हल्ला केला. त्यावेळी दीपकने आरडाओरड सुरू केली. त्याचे काका मदन काळे बाजूच्या शेतात होते. आवाज आल्याने त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर अस्वलाने तिथून पळ काढला. या हल्ल्यात दीपक काळे यांच्या डोळ्याजवळ गंभीर दुखापत झाल्याने तत्काळ जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. घटनेमुळे शेतकऱ्यांसह मजुरांमध्ये भीती पसरली आहे.

# कोथिंबिर विकणारा तरुण आर्मीत नर्सिंग असिस्टंट

जनसंचलन/हिवरा आश्रम

कोथिंबीर विकून शिक्षण घेणारा देऊळगाव माळी येथील शिवओम मदनराव बळी याने इंडियन आर्मी मध्ये नर्सिंग असिस्टंट या पदाला गवसणी घातली. शिवओम बळी याने लहानपणापासूनच आई-वडिलांना कामात मदत केली. त्याने कोथिंबीर विक्री, वाहन व्यवसाय केला. अडचणीचा नेटाने सामना करत त्याने उराशी बाळगलेले स्वप्न पूर्ण केले. आर्मीतील नर्सिंग असिस्टंट म्हणून प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल देऊळगाव माळी गावकऱ्यांनी १८ डिसेंबर रोजी शिवओम बळीची गावातून मिरवणूक काढून त्याचा सन्मान केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच किशोर गाभणे होते. माजी प्राचार्य कैधळे, बळीनाथ गिरी महाराज, अशोक मगर, रघुनाथ भराड, किसनराव बळी, प्रकाश महाराज मगर, कैलास राऊत, रवींद्र मगर पाटील, सचिन मगर, माजी पं. स. सदस्य शिवप्रसाद मगर हजर होते.

# कुऱ्हा येथील युवकाची आत्महत्या...



जनसंचलन/मोताळा

कुऱ्हा येथील २३ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना २१ डिसेंबर रोजी घडली. गजानन पांडुरंग तायडे असे मृतक युवकाचे नाव आहे. कुऱ्हा येथील गजानन तायडे हे २१ डिसेंबर रोजी दुपारी शेतात गेले होते. त्यांनी शेतातील निंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची चर्चा गावात झाली. तायडे यांच्या नातेवाइकांनी शेतात जाऊन पाहिले असता ते गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळले. या प्रकरणी शिवाजी ओंकार तायडे यांनी धामणगाव बढे पोलिसात फिर्याद दिली. त्यावरून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. घटनेची माहिती मिळताच धामणगाव बढे पोलिसांनी घटनास्थळावर धाव घेवून पंचनामा केला. युवकाने आत्महत्या का केली, याचे कारण मात्र समजू शकले नाही. पुढील तपास धा. बढे पोलिस स्टेशनचे ठाणेदार नागेश जायले यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ. शरद बाठे करीत आहेत.

# पालकमंत्री पद नेमकं कोणाकडे जाणार?

## फुंडकर यांना मिळण्याची शक्यता शिंदेसेना, राकाँच्या भूमिकेकडे लक्ष

जनसंचलन/ खामगाव

जिल्ह्यातील चार जणांची नावे मंत्रिपदासाठी जोरदार चर्चेत असताना महायुतीतील भाजपचे ॲड. आकाश फुंडकर यांच्या गळ्यात ती माळ पडली. त्यांना कामगार खातेही मिळाले. आता बुलढाणा जिल्हा पालकमंत्रिपदी कोणाची वर्णी लागते, याची चर्चा बुलढाण्यासह लगतच्या अकोला जिल्ह्यातही सुरू झाली आहे. विशेष म्हणजे, भाऊसाहेब फुंडकर यांनी अकोला जिल्ह्याचे पालकमंत्रिपद सांभाळले असल्याने त्यांनाही अकोल्याचे पालकत्व मिळते का, याची चाचपणीही सुरू झाली आहे. त्यातच शिंदेसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी थेट विधिमंडळातच जिल्ह्यातील अवैध धंद्यावर बोट ठेवत सत्ताधारी महायुतीला घरचा आहेर दिल्याने त्यांची भूमिकाही महत्त्वाची ठरू शकते. बलढाणा जिल्ह्यातील माजी मंत्री डॉ. संजय कुटे, विदर्भ वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष चैनसुख संचेती, चिखलीच्या आमदार श्वेता महाले यांच्या मंत्रिपदाची चर्चा अखेरच्या क्षणापर्यंत होती. त्याचवेळी अखेरपर्यंत स्पर्धेत नाव नसलेल्या ॲड. आकाश फुंडकर यांच्या गळ्यात अनपेक्षितपणे मंत्रिपदाची माळ पडली. त्यामुळे इतर तीनही आमदारांनी आता धीर धरला आहे. तर डॉ. संजय कुटे यांनी मंत्रिपद न मिळाल्याने त्यांची भूमिकाही समाजमाध्यमांवर मांडली. त्यामध्ये मंत्रिपद न मिळाल्याने त्यांनी त्या प्रक्रियेतील कणाचेही नाव न घेता कुटनीती झाल्याचा उल्लेखही केला. त्यावर मोठ्या प्रमाणात चर्चा झाली. त्यांच्या समर्थनार्थ आणि ट्रोल करणाऱ्या कमेंटसही झाल्या. ही सर्व परिस्थिती पाहता आता बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्रिपद कुणाकडे जाईल, याची चर्चाही सुरू झाली आहे. कामगार मंत्री फुंडकर यांचा स्वजिल्हा असल्याने त्यांनाच पालकत्व द्यावे, असा सूर आहे. तर राजकीय परिस्थितीचा विचार केल्यास जिल्हा सांभाळण्याची जबाबदारी इतर कुणावर दिली जाते काय, अशीही चर्चा आहे

# अमित शाह यांना पदावरून हटवा महाविकास आघाडी आक्रमक !

जनसंचलन/ सिंदखेड राजा



केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी केलेल्या वक्तव्याचा निषेध व्यक्त करीत शाह यांना घटनात्मक पदावरून तत्काळ हटविण्यात यावे, अशी मागणी करीत महाविकास आघाडीच्या वतीने तहसीलादारांना निवेदन देण्यात आले. अमित शाह यांच्या त्या वक्तव्याचे देशभरात पडसाद सर्वत्र उमटत आहेत. अनेक ठिकाणी आंदोलने करण्यात आली. शहरातील उद्धवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार, काँग्रेसच्या वतीने तहसीलदारांमार्फत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना संयुक्तपणे निवेदन देण्यात शुक्रवारी दुपारी तहसील परिसरात अमित शाह यांच्या विरोधात घोषणा देऊन त्यांना तत्काळ या पदावरून हटविण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. मागणी पूर्ण न झाल्यास आंदोलनाचा इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी उद्धवसेनचे संपर्कप्रमुख छगनराव मेहेत्रे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जिल्हा सरचिटणीस विजय तायडे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी राजेजाधव, सावता परिषदेचे जिल्हाध्यक्ष श्याम मेहेत्रे, युवा सेनेचे योगेश म्हस्के, राजेश देशमुख, माजी नगराध्यक्ष सीताराम चौधरी, माजी उपनगराध्यक्ष दिलीप आढाव, दिलीप चौधरी, राजेंद्र अंभोरे, शिवाजी ठाकरे, संजय मेहेत्रे, अमोल भाट, हरिभाऊ चौधरी, उल्हास भुसारे, विजय घोंगे, हिंमतराव काळे, संजय म्हस्के, मगन जाधव यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.






The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अहिल्यानगर येथे स्वागत

वृत्तसंस्था/ अहिल्यानगर

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशनचे वैद्यकीय महाविद्यालयाच्या हेलिपॅड येथे आगमन झाले. त्यांच्या समवेत विधान परिषद सभापती प्रा.राम शिंदे होते. जलसंपदा मंत्री (गोदावरी आणि कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्र्यांचे स्वागत केले. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांची भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले. अण्णा हजारे यांना समाजसेवेसाठी उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभावे अशी सदिच्छा मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी आमदार संग्राम जगताप, शिवाजीराव कर्डिले, काशिनाथ दाते, माजी मंत्री बबनराव पाचपुते, विभागीय आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ, नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, पोलीस अधीक्षक राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष



येरेकर, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे आदी उपस्थित होते. तत्पूर्वी मुख्यमंत्री महोदयांच्या शिर्डी विमानतळ येथे आगमन झाले. उपविभागीय अधिकारी माणिक आहेर यांनी त्यांचे स्वागत केले.

## इ क्लास वन जमिनीत असणाऱ्या शेतकऱ्यांचे नावे कायम भाडेपट्टी मिळण्यासाठी मुख्यमंत्री यांना अनेक वेळा दिले निवेदन..

## शासकीय इ क्लास वन हक्क अधिनियमाच्या निकषाप्रमाणे पात्र वन धारकांना तत्काळ वन पट्ट्याचे वाटप न केल्यास निघणार लाँग मार्च

जनसंचलन/बुलढाणा

गेल्या अनेक वर्षापासून कसत असलेल्या इ क्लास वन जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावे कायम भाडेपट्टे मिळण्यासाठी मुख्यमंत्री यांना अनेक वेळा निवेदन देऊनही दखल न घेतल्यामुळे शासकीय इ क्लास वन हक्क अधिनियमाच्या निकषाप्रमाणे पात्र वन धारकांना तत्काळ वन पट्ट्याची वाटप करण्यात यावी या मागणीसाठी परत एकदा जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले आहे. मागणी मान्य न झाल्यास लाँग मार्च काढण्यात येणार असल्याची माहिती भारतीय समता संघटनेच्या वतीने देण्यात आली आहे. सन १९८९ च्या अगोदर पासून शासकीय इ क्लास वन जमीनीवर शेती प्रयोजनासाठी कब्जा करून आमची उपजीविका भागवत आहोत सदर जमीन ही आमच्या नावावर करून मिळण्यासाठी शासनाकडे वेळोवेळी निवेदन व अर्ज दाखल केलेले आहे मात्र शासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले असून निवेदनाच्या माध्यमातून आमच्याकडे असलेल्या सबळ पुरावे निशी १४ एप्रिल १९७८ पासूनचे आतापर्यंत आमच्याकडे



असलेले सबळ पुराव्यासह अनेक वेळा जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रकरणे दाखल केली असून सुद्धा जाणीवपूर्वक याकडे शासकीय अधिकारी यांनी पाठ फिरवली आहे असे तक्रारीत म्हटले आहे. तक्रार करते यांच्या ताब्यात व वहिती असलेल्या जमिनीवर महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांच्या हितासाठी मुख्यमंत्री सौर कृषी योजनेअंतर्गत सौर ऊर्जेचे प्रकल्प उभारणीचे काम शेतकऱ्यांच्या हितासाठी व शेतकऱ्यांना कायम वीज मिळण्यासाठी सरकारने घेतलेला निर्णय स्वागतार्थ असून सरकारने सौरऊर्जेचे प्रकल्प अशा ठिकाणी घ्यावा की तेथील शासकीय जमीन कोणाच्या भोगवट्यात नसून व त्या जमिनीवर कोणत्याही गोरगरिबाचा कब्जा नसेल व ती जमीन पडीक व विना वापर पडलेली असेल अशा ठिकाणी सरकारने सौर ऊर्जेचा प्रकल्प घेण्यास कोणाचेही हरकत असणार नाही परंतु सरकारने भूमिहीन यांच्या ताब्यात असलेल्या जमिनीवर सौरऊर्जेचा प्रकल्प न घेता तो इतर ठिकाणी घेण्यात यावा शेतकऱ्यांसाठी सरकारने घेतलेला निर्णय हा धोरणात्मक असून असाच निर्णय भूमीहीन शासकीय जमीन कब्जाधारी शेतकरी यांच्यासाठी सरकारने का घेऊ नये? असा प्रश्न यावेळी तक्रार करते यांनी मांडला आहे. त्यामुळे लवकरात लवकर शासकीय इ क्लास वन हक्क अधिनियमाच्या निकषाप्रमाणे पात्र वन धारकांना तत्काळ वन पट्ट्याचे वाटप करण्यात यावे न केल्यास पायी लाँग मार्च काढण्यात येणार असे तक्रार करते यांनी तक्रारीत म्हटले आहे

# सत्यजित इंग्लिश स्कूलचा क्रिकेट संघ राज्यस्तरावर

जनसंचलन/मेहकर


स्थानिक सत्यजीत इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलच्या वयोगट १७ चा क्रिकेट संघ विभागीय स्तरावर सर्वप्रथम येऊन राज्यस्तरासाठी पात्र ठरला आहे. मेहकर तालुका क्रीडा संकुलावर विभागीय स्तरावर क्रिकेट सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अमरावती विभागातील सात संघांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत अंतिम सामन्यासाठी पोद्दार इंटरनॅशनल स्कूल, अमरावती व सत्यजित इंटरनॅशनल स्कूल, मेहकर हे दोन संघ अंतिम फेरीसाठी पात्र ठरले. चुरशीच्या सामन्यात सत्यजित इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी ६ रनने बाजी मारत प्रथम क्रमांक पटकावला. या क्रिकेट संघात शिवप्रसाद चव्हाण, साहिल जाधव, उदय डिघोळे, रोहन नागरे, जयेश माने, शंतनू गिरी, पीयूष सिरसाट, आयुष फुटाणकर, शिवाक्ष मिश्रा, प्रणव नागरे, समर्थ देशमुख, अथर्व ठाकरे, चैतन्य सिरसाट, प्रशीक खंदारे, राजवीर अवस्थी यांचा सहभाग होता. संघाला प्राचार्य रवींद्र माळी, भगवान इंगळे, अंकित चनखोरे यांनी मार्गदर्शन केले.

# डिझेल लंपास करणारे चौघे जेरबंद !

## समृद्धीवर ८० लीटर डिझेलची चोरी

जनसंचलन/बिबी

समृद्धी महामार्गावर उभ्या असलेल्या वाहनातून डिझेल लंपास करणाऱ्या टोळीला बिबी पोलिसांनी २० डिसेंबर रोजी गजाआड केले. ठाणेदार संदीप पाटील यांनी डिझेल चोरांचा छडा लावून चौघांना अटक केली. समृद्धी महामार्गावर फिर्यादी किरण कुमार लिंगया कन्नूकुंटला (रा. कल्याणी टॉवर जवळ चंद्रपूर, तालुका जि. चंद्रपूर) हे दुसरबीड टोलनाक्याजवळ वाहन थांबवून आराम करत असताना रात्रीचे तीन वाजता ट्रकच्या डिझेल टाकीतील अंदाजे ८० लिटर डिझेल किंमत सात हजार रुपये अज्ञात चोरट्यांनी लंपास केले होते. ट्रकच्या काचांना दगड मारून समोरील काच फोडून अंदाजे पाच हजार रुपयांचे नुकसान केले होते. या प्रकरणी बिबी पोलिसांनी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला होता. या प्रकरणाचा तपास करीत असताना बिबी पोलिसांनी गोपनीय बातमीदारांकडून मिळालेली माहिती तसेच तांत्रिक साधनांचा वापर करून आरोपी निष्पन्न केले. ठाणेदार संदीप पाटील यांच्यासह सफो परमेश्वर शिंदे, अरुण सानप, रवींद्र बोरे यांनी पोलिस स्टेशन चिखली हद्दीत गजानन नगर चौफुलीवर त्यातील ३५ लिटर क्षमतेच्या रिकाम्या ४ कॅन असे साहित्य जप्त केले. या आरोपींनी गुन्ह्यातील डिझेल सचिन परशराम घुबे (रा. देऊळगाव घुबे) याला विक्री केले आहे. त्याला ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने डिझेल विकत घेतल्याची कबुली दिली. या आरोपींना २१ डिसेंबर रोजी न्यायालयात हजर केले असता त्यांना न्यायालयाने २३ डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. पुढील तपास मेहकरचे उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार संदीप पाटील, पोलिस हेड कॉन्स्टेबल मोहिते व इतर करीत आहेत. समृध्दी महामार्गावर उभी राहणाऱ्या वाहनातून डिझेल चोरीच्या घटना अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत.



# महायुती सरकारच्या महिलांविषयी योजनांमुळे महिला सक्षमीकरण व महिलांची आर्थिक स्थिती सुधारण्यास अधिक बळकटी.

## ती या सदराखाली कार्यक्रमात बोलताना उपसभापती नीलम ताई गोऱ्हे यांचे प्रतिपादन

वृत्तसंस्था/पुणे

१० चिल्ड्रन या आंतरराष्ट्रीय उपक्रमांतर्गत होत असलेल्या ती या बहुविध चर्चा सत्र कार्यक्रमास आज शिवसेना नेत्या तसेच महाराष्ट्र विधान परिषद उपसभापती नीलम ताई गोऱ्हे या उपस्थित होत्या हा कार्यक्रम महर्षी कर्वे श्री शिक्षण संस्थेचे प्रांगण कर्वेनगर येथे पार पडला. याप्रसंगी बोलताना नीलम ताई गोर्हे म्हणाल्या उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये संपूर्ण देशात मुलींची संख्या अग्रगण्य आहे त्यासोबतच क्रीडा क्षेत्रात देखील संपूर्ण देशात मुलींचे विशेष योगदान दिसून येते . स्त्री- पुरुष समानता या विषयावर लक्ष केंद्रित करणे ही काळाची गरज असून मुलींचा जन्मदर राज्यात चिंतेचा विषय आहे मात्र कोकणात मुलींचा जन्मदर हा बरोबरीने दिसून येतो. महायुती सरकारच्या वतीने गेल्या अडीच वर्षात महिलांविषयी लहान मुलीं विषयी लेक लाडकी योजना असो,बालसंगोपन योजना असो,लाडकी बहीण योजना असो या योजनानमुळे महिलांचा आर्थिक विकास व महिला सक्षमीकरण या क्षेत्रात प्रगती झालेली निश्चितच दिसून येते लाडकी बहिण योजनेमुळे गरीब घरातील मुलींच्या शिक्षणात निश्चितच प्रगती झाल्याचं भविष्यात आपल्याला दिसून येईल, तसेच या योजनांमध्ये अनेक संस्थांकडून जनजागृती होणे हे देखील तितकेच महत्वाचे आहे. मुलींच्या विषयी बोलताना उपसभापती नीलम ताई म्हणाल्या लैंगिक छळाचा घटनेमध्ये मुलींनी हिम्मत दाखवणे आवश्यक आहे मुलींनी हिम्मत दाखवल्यास निश्चितच न्याय मिळवायला अधिक मदत होईल असे सांगत त्यांनी अशा घटनात प्रतिकाराच्या प्रसंगांची ऊदाहरणे दिली. या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील संस्थाचालकांचा विशेष करून मुलींच्या शिक्षणासाठी काम करणाऱ्या संस्थांचा सहभाग होता तसेच योगिता आपटे अनुराधा सहस्रबुद्धे या सहभागी होत्या . या कार्यक्रमाचे आयोजन श्रीरंग गोडबोले व विभावरी देशपांडे यांच्या नेतृत्वात रेनबो फाऊंडेशन तर्फे करण्यात आले होते .



## बंदूक.. कोयता.. गॅस कटर...आणखी बरेच काही!

# सोनेके लुटेरे बचके जायेंगे कहा?

जनसंचलन/बुलढाणा

अल्पावधीत श्रीमंत होण्याचे स्वप्न बाळगून असणाऱ्या काही लुटारूंनी सोने चांदीचे दागिने चोरण्याचा कट रचला होता. परंतु एलसीबी च्या पथकाने या लुटेरांना जेलची हवा दाखवली!ही कारवाई एसपी विश्व पानसरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि एलसीबी प्रमुख अशोक लांडे यांचे नेतृत्वातील पथकाने केली. बुलढाणा जिल्हयातील सोने-चांदीचे दुकान लुटण्याचा कट एलसीबीने उधळला असून, २आरोपींना अटक केली. आरोपी कडून बंदूक, कोयता, गॅस कटर, चारचाकी वाहन, तीन चोरीच्या मोटारसायकलसह १०,८३,७७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यातआला आहे.०८गंभीर चोरी,घरफोडीच्या गुन्ह्याची उकल करण्यात आली. पो.स्टे. जानेफळ हद्दीतील ग्राम शेंदला येथील हरिंदरसिंग संतोषसिंग दुधानी हा चोरी-घरफोडी करण्याच्या उद्देशाने अवैध शस्त्र बाळगून, गांव व इतर परिसरात रात्री-बेरात्री फिरत असतो. सदर माहितीवरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शेंदला गावी जावून संशयीत ईसम हरिंदरसिंग संतोषसिंग दुधानी याचा शोध घेवून, त्याचे राहते घराची झडती घेतली असता, त्याचे घरात अवैध शस्त्र आढळून आले. त्याला पोलिसी खाक्या दाखवला असता त्याचे ४ ते ५ साथीदार यांनी चिखली शहरातील प्रतिष्ठीत सोनाराचे दुकान फोडण्याचा कट रचुन रेखी केली होती त्यासाठी वाशीम जिल्हयातुन बोलेरो गाडीसुध्दा चोरी करुन त्यांनी आणली होती. त्याचा एक साथीदार गणेश जनार्धन मानवतकर रा. शेंदला यास अटक करण्यात आली असुन इतर आरोपींचा शोध सुरु आहे.



## सहकार विद्या मंदिर, कला व वाणिज्य महाविद्यालय डोंगर खंडाळा येथे वार्षिक स्नेहसंमेलन

जनसंचलन/बुलढाणा

स्थानिक स्व. बसंतीबाई देवकीदासजी चांडक सहकार विद्या मंदिर, डोंगर खंडाळा येथे वार्षिक स्नेहसंमेलन अंतरंग २०२४ -२५ चे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष बुलडाणा अर्बन चे चीफ मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. सुकेशजी झंवर साहेब , प्रमुख पाहुणे म्हणून बुलढाणा ग्रामीण पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद माळी सर व त्याचे सहकारी, गावच्या सरपंच प्रज्ञाताई कांबळे, स्थानिक संचालक मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणातून डॉ. सुकेशजी झंवर यांनी बुलढाणा अर्बन परिवार समाजाच्या विकासाच्या दृष्टीने कसा कार्यरत आहे यावर प्रकाश टाकला तसेच मुलांच्या विकासासाठी, समाजाच्या विकासासाठी बुलढाणा अर्बन यांच्यामार्फत सुरू असलेल्या वेगवेगळ्या उपक्रमांची माहिती देण्यात आली. विशेष म्हणजे भगवत गीतेचे महत्व व त्याची असलेली गरज ज्यातून आपण सर्व आपली भारतीय संकृतिचे जतन करून देशासाठी आदर्श नागरी होऊ. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शरद माळी यांनी यश मिळवायचे असेल तर अथक परिश्रम गरजेचे असतात. मुख्याध्यापक



सतीश रोढे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावनेमध्ये भाईजी याचे शिक्षण व त्यातून आपल्या समाजाची प्रगती ही संकल्पना मांडली तसेच शाळेकडून विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास कसा सुरु आहे. १९आणि २० डिसेंबर या दोन दिवसात पार पडलेल्या वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या वेगवेगळ्या कलागुणांचे उत्कृष्ट प्रदर्शन गेले. त्यामध्ये मोबाईल वापराचे विद्यार्थ्यांवर होणारे परिणाम, हुंडा प्रथा , शेतकऱ्यांची व्यथा, विज्ञानाचे महत्व, अंधश्रद्धा निर्मुलन, पाण्याचे महत्व, छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहास, थोर पूर्वांचे महत्व, अशा वेगवेगळ्या मुद्यांवर प्रकाश टाकण्याचा पायत्न विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न केला. १९ डिसेंबर ला सूत्रसंचलन नितीन घुले, अर्ती सावळे, केतन गीते, पूजा देशमुख, आदींनी केले तचेच २० डिसेंबरला गायत्री पालीवाल व रिटा काटकर यांची सूत्रसंचलन केले.

# रेशनच्या तांदळाची खुल्या बाजारात विक्री....

जनसंचलन/ खामगाव

राज्यात कोणीही उपाशी राहू नये, त्यांना कमी पैशात अन्नधान्य उपलब्ध व्हावे. त्यांचा आर्थिक स्तर उंच व्हावा म्हणून शासनाने गरिबातल्या गरीब नागरिकांसाठी राष्ट्रीय अन्नसुरक्षा ही योजना सुरू केली. कोरोना काळात राज्यातील गोरगरीब जनतेला त्याचा फटका बसू नये, यासाठी अन्नसुरक्षा योजनेतील लाभार्थ्यांना मोफत तांदूळ देण्याचा निर्णय तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी घेतला. तेव्हापासून नागरिकांना मोफत धान्य वितरित केल्या जात आहे. शासनाचा उद्देश चांगला असला तरी नागरिकांनी या मोफत रेशनाकडे पाठ फिरवली. मिळणारे धान्य अनेक कुटुंब खुल्या बाजारात विक्री करीत असल्याचे चित्र ग्रामीण भागात आहे. केंद्र शासनाने २०१३ मध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा संमत केला होता. या कायद्यांतर्गत



प्राधान्य गटाच्या लाभार्थ्यांना अन्नधान्य वाटप करण्यात येते. योजनेत श्रीमंतांचाच भरणा अधिक असल्याने खरे लाभार्थी वंचित असून श्रीमंतच लाभार्थी अधिक आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958